**वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या मनुष्यहानीसाठी अर्थसहाय्य देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३३७/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ३० मार्च, २०१३.

**पहा :-** शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.डब्ल्यूएलपी-१००८/प्र.क्र.२७०/फ-१, दिनांक ०२.०७.२०१०.

**प्रस्तावना :-**

वाघ, बिबट्या, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस व रानकुत्रे (ढोल) यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत संरक्षण देण्यात आलेले आहे. वनक्षेत्राच्या अधिवासात आढळणाऱ्या हिंस्त्र प्राण्यांकडून होणाऱ्या हल्ल्यात मनुष्य हानी झाल्यास दिनांक ०२.०७.२०१० च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार अर्थसहाय्याची रक्कम संबंधितांना अदा करण्यात येते. सदर शासन निर्णयान्वये मनुष्यहानी प्रकरणी देण्यात येणारी अर्थसहाय्याची रक्कम कमी असल्यामुळे त्यात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वाघ, बिबट्या, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, हत्ती, मगर व रानकुत्रे (ढोल) यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती मृत झाल्यास, कायम अपंग झाल्यास किंवा गंभीररित्या जखमी झाल्यास खालील तक्त्याप्रमाणे अर्थसहाय्य दिनांक ०२.०७.२०१० रोजीच्या शासन निर्णयामधील याबाबत दिलेल्या अटींच्या अधिन राहून देण्यात यावे.

**व्यक्ती मृत झाल्यास, कायम अपंग झाल्यास किंवा गंभीररित्या जखमी झाल्यास**

| अ.क्र. | तपशील | देय अर्थसहाय्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | व्यक्ती मृत झाल्यास | रुपये ५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त ) |
| २ | व्यक्ती कायम अपंग झाल्यास | रुपये ४,००,०००/- (रुपये चार लाख फक्त ) |
| ३ | व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यास | रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) |

२. वरील तक्त्यातील अनुक्रमांक-२ येथील प्रकरणी, कायम अपंगत्वाचा दाखला जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून घेणे आवश्यक राहील.

३. उपरोक्त तरतुदी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( प्रवीण परदेशी )
प्रधान सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रत माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी :-

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे प्रधान सचिव.
मा. उपमुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे सचिव.
मा. मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (कृषी), कृषी वै पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा.नागपूर,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर.
संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, म.रा. पुणे
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व
मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर /मुंबई (बोरीवली)/नाशिक
वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे / कोल्हापूर / नाशिक
वनसंरक्षक, कोल्हापूर, उत्तर चंद्रपूर, दक्षिण चंद्रपूर.
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
सर्व पोलिस आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
उपवनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे/गोंदिया/अकोला/आलापल्ली चंद्रपूर स्थित/औरंगाबाद
उपविभागीय वन अधिकारी, सांगली/उस्मानाबाद/बीड/भोर/चिपळूण/संगमनेर/मालेगाव/हिंगोली.
सर्व पोलिस अधीक्षक
सर्व जिल्हा कृषी अधिकारी
महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ (निवडनस्ती).

------------

एच-०६३२ -१३अ.
D:\CR WISE\2012\GENERAL FILES-2012CR-337-2012-wildlife compensation.lwp

विभागिय वनअधिकारी (प्रसिद्धी विभाग)
नागपूर